# - प्रेस नोट -

दि. ०५/०८/२०२६

## चुनाभट्टी पोलीस ठाणे - खुन

दि. ०३/०८/२०२६ रोजी १८.३० वा ते १८.३५ वा.च्या दरम्यान फिर्यादी शहजाद इरशाद खान, वय- ३३ वर्षे, धंदा- मजुरीकाम, रा.ठी. कुर्ला (पूर्व), मुंबई यांच्या भावास अटक आरोपी पुरूष, वय-२४ वर्षे याने मुन्नी अप्पाच्या घराशेजारी, सय्यद बाबा चाळ, कुरेशीनगर हिल, कुर्ला पुर्व, मुंबई येथे घराच्या भिंतीवर लघुशंका करण्याच्या कारणाने झालेल्या वादाचा राग मनात धरून फिर्यादीला अपशब्द बोलला असता फिर्यादीचा भाऊ फरहान खान याने त्यास माझ्या भावाबरोबर अस का बोलत आहे असे बोलला असता अटक आरोपी पुरुष याला राग आला व त्याने फरहान खान याला धमकी देवून त्याला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या छातीवर जोराने हाताने बुक्का मारून त्याला दोन्ही हाताने धक्का देवून फरहान याला सिमेंटच्या पायरीवर तोंडावर पाडून जिवे ठार मारले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०४/०८/२०२६ रोजी गु.र.क्र. ६३०/२६, कलम १०३(१) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------